NAAC Reaccredited 4th Cycle 'A' Grade (3.11 CGPA) | Certified with ISO 9001:2015 (QMS) & ISO 14001: 2015(EMS) | Best College Award Winner SPPU, Pune

NUTAN VIDYA PRASARAK MANDAL'S
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, LASALGAON
Affiliated to Savitribai Phule Pune University
Code No.: PU/NS/ASC/007/1967 | UDIES NO.:27201005811
PUN Code : CAAN017390 | College Code : 053 | Center Code : 027
Junior College Index No. : J.13.08.006, HSC Vocational Index No. : J.13.08.903

National services scheme

Report

Name of the department/ Committee	NSS
Name of the Coordinator	Asst. Prof. Dr. Sanjay Shinde
Title of the event/ program	Special winter camp
Objective of the event	Develop student personality by working with people in society
Date/ Period of event/ program	23/12/2025 to 29/12/2025
Sponsored institute / Institution	Arts ,Commerce & Science college ,Lasalgaon
Total no. of participants	125
Name of the expert/inviter/Lecturers	--
Venue of the event/program	Adopted village Khedale-Zunge Tal-Niphad (Nashik)

Dr. Sanjay Shinde
Program Officer

Dr. Adinath More
Principal
Arts, Com.& Sci College
Lasalgaon-422306(Nashik)

Nutan Vidya Prasarak Mandal's
Arts Commerce and Science College, Lasalgaon,
Tal. Niphad, Dist. Nashik
Department of NSS

Academic Year 2025-2026

Winter Special Camp Report

Date- 23rd December 2025 to 29th December 2025

The winter camp was organized under the Department of NSS of N.V.P Mandal's Arts Commerce and Science College Lasalgaon, Dist.- Nashik from 23rd Dec.2025 to 29 th Dec. 2025. The camp was held in the village of Khedale-Zunge Tal-Niphad (Nashik). 125 students have participated in this camp.

Winter Special Camp Report

Name of the Adopted Village: Khedale-Zunge Tal-Niphad, Dist.- Nashik

Camp Period :(23rd December 2025 to 29th December 2025)

Total Strength of the Camp: Male- 61, Female- 64 Total- 125

Special Camp Report:

1) Organized expert lectures on various relevant issues such as Role of youth in Sustainable development with special focus on watershed management and wasteland development etc.

2) During the camping period volunteers cleaned the surrounding of primary school, Secondary School, Mahadev Mandir, Khanderao Mandir, Maroti Mandir, Tukaram Baba Mandir and Bajartal of the village.

3) Volunteers doing the cleanliness in front of Grampanchayat and nearby Sant Van area as well as bank of the Godavari River.

4) Organized various cultural activities about issues for Voter awareness of the local people.

5) Organized Health Checkup Camp in association with Lasalgaon Medical Association held on 26 December 2025, total 35 local citizens participated in this camp.

6) Organized Physical exercise, Yoga, intellectual games, *lezim* training etc. every morning during the camping period.

7) Awareness for local people's Organization of public awareness rally and door to door visit.

8) Street plays were performed on topics such as Drug Addiction, *Nasha Mukti*, Women Empowerment, Voting Awareness etc.

Dr. Pradip Sonawane Dr. Sanjay Shinde Prof. Punam Aher
Program officers

Dr. Adinath More
Principal
Arts, Com.& Sci College
Lasalgaon-422306(Nashik)

महाराष्ट्रातील जनतेचा आवाज, दैनिक सांजसंध्या
आवाज

लासलगाव महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

दै. आवाज वृत्तसेवा...

लासलगाव, ता.२३ ( ) : येथील नूतन विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर अंतर्गत दि. २३/१२/२०२५ ते दि. २९/१२/२०२५ या दरम्यान आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन सोहळा श्रीक्षेत्र संतवन, खेडलेझुंगे येथे अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन तसेच प्रतिमा पूजनाने करण्यात झाली. विद्यार्थिनींनी स्वागत गीतातून सर्व मान्यवरांचे स्वागत केले. यानंतर पुष्पगुच्छ देऊन सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

या उद्घाटन सोहळ्याला कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नूतन विद्या प्रसारक मंडळाचे चेअरमन श्री.प्रकाश पाटील हे उपस्थित होते. तर उद्घाटक म्हणून योगीराज तुकाराम बाबा संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.रघुनाथ महाराज खेडलेकर लाभले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नू.वि.प्र. मंडळाचे खजिनदार श्री.अनिलशेठ डागा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांची



उपस्थिती लाभली. तसेच याप्रसंगी मंचावर उपप्राचार्य प्रा.भूषण हिरे, पर्यवेक्षक प्रा.उज्वल शेलार, प्रा.किशोर गोसावी, सरपंच सौ.माया सदाफळ, उपसरपंच श्री.विश्वनाथ घोटेकर, तंटामुक्ती अध्यक्ष श्री.मच्छिंद्र साबळे, तंटामुक्ती उपाध्यक्ष श्री.अशोक घोटेकर, श्री.विजय सदाफळ, प्राचार्य श्री.लहानु ठाकरे, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय शिंदे, प्रा.सुनिल गायकर, प्रा.देवेंद्र भांडे, प्रा. पुनम आहेर, प्रा.निकिता चव्हाण, प्रा.श्रेया जगताप, डॉ.मारोती कंधारे, प्रा.जितेंद्र देवरे, प्रा.रामनाथ कदम, प्रा महेश होळकर तसेच खेडलेझुंगे ग्रामपंचायतचे सदस्य, विविध कार्यकारी सोसायटीचे सर्व सदस्य, तंटामुक्ती समितीचे सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ व रा.से.यो. स्वयंसेवक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून लाभलेले योगीराज तुकाराम बाबा संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. रघुनाथ महाराज खेडलेकर यांनी विद्यार्थ्यांना श्रम व संस्कार यांचे महत्त्व तसेच राष्ट्रनिर्मितीत युवकांचा सहभाग या गोष्टी समजावत राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांमध्ये संस्काराची जडणघडण होते. आणि हे संस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांमध्ये रुजविले जातात असे प्रतिपादन केले. लासलगाव महाविद्यालयाच्या वतीने श्रीक्षेत्र संतवन, खेडलेझुंगे येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. तर नू.वि.प्र. मंडळाचे खजिनदार श्री.अनिलशेठ डागा यांनी जीवनात शिबिराचे महत्व सांगताना सर्व स्वयंसेवकांनी आपल्या कामातून गावात ठसा उमटविण्याचे आवाहन करून श्रमदान करण्याचे आवाहन केले. यानंतर प.पू. तुकाराम बाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री.लहानु ठाकरे सर यांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक सहभागाचे कौतुक केले. अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळते, नेतृत्व गुण विकसित होतात असे नमूद केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांनी रा.से.यो. स्वयंसेवकांनी शिबिराच्या माध्यमातून समाजविकास व व्यक्तिमत्वाचा विकास साधावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिल गायकर यांनी केले, डॉ.संजय शिंदे यांनी प्रास्ताविकामध्ये शिबिराचा उद्देश, सात दिवसाचे नियोजन, होणारे उपक्रम यांची सविस्तर माहिती दिली. तर प्रा.देवेंद्र भांडे यांनी आभार मानले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे हे विशेष श्रमसंस्कार शिबिर नूतन विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा.गोविंदरावजी होळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र खेडलेझुंगे ता.निफाड जि.नाशिक या ठिकाणी संपन्न होत आहे.

24 Dec 2025 - Page 4 | dailyawaz.com
Powered by softisky | 9764331134

गांवकरी
समीर पठाण पत्रकार
www.gavakari.net
29 Dec 2025 - Page 6
लासलगाव

खेडलेझुंगेतील शिबिरात मोफत आरोग्य तपासणी

लासलगाव महाविद्यालयातर्फे उपक्रम

लासलगाव : वार्ताहर

येथील नूतन विद्या प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या श्रीक्षेत्र संतवन, खेडलेझुंगे येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिरात आरोग्य तपासणी व हिमोग्लोबिन तपासणी शिबिर झाले. लासलगाव डॉक्टर्स असोसिएशनतर्फे सर्व स्वयंसेवक विद्यार्थी व नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी केली. डॉ. श्रीकांत आवारे यांनी आरोग्य शिबिराचे उद्घाटन केले.

लासलगाव डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. स्वप्नील जैन अध्यक्षस्थानी होते. त्यांच्यासमवेत डॉ. संगीता सुरसे, डॉ. युवराज पाटील, डॉ. ऋता धनगाव, डॉ. अविनाश पाटील, डॉ. वैशाली पवार, डॉ. नितीन न्याहारकर, डॉ. ईश्वर वाकचौरे, डॉ. सागर घनगाव, डॉ. अर्चना लोहाडे आदी उपस्थित होते. डॉ. आवारे यांनी



आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. डॉ. संगीता सुरसे, डॉ. अविनाश पाटील, डॉ. ईश्वर वाकचौरे, डॉ. वैशाली पवार यांनीही स्वयंसेवकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. प्राथमिक आरोग्य केंद्र, देवगाव आणि खेडलेझुंगे यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिरातील स्वयंसेवकांची मोफत हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सचिन शिंदे, त्यांच्यासमवेत आरोग्यसेवक डॉ. चंद्रकांत यादव, डॉ. शोभा कुंभार्डे आदी उपस्थित होते. शिबिरासाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी गोविंदराव होळकर, प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रदीप सोनवणे, डॉ. संजय शिंदे, प्रा. सुनील गायकर, प्रा. देवेंद्र भांडे आणि रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.


नूतन विद्या प्रसारक मंडळाचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तासलगाव,
ता. निफाड, जि. नाशिक
"NOT ME BUT YOU"



महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव
आवाज

लासलगाव महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराची सांगता





दै. आवाज वृत्तसेवा...

येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा चांगल्या प्रकारे व्यक्तिमत्त्व विकास होतो असे प्रतिपादन नू.वि.प्र. संस्थेचे अध्यक्ष ड.आंबादास आवारे यांनी केले. लासलगाव येथील नूतन विद्या प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रीक्षेत्र संतवण, खेडलेझुंगे येथे संपन्न झालेल्या विशेष हिवाळी शिबिराच्या समारोप प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते, कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.

कार्यक्रमाला समारोपकर्त्या म्हणून अमृताताई पवार उपस्थित होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून ऑलम्पिक धावपटू संजीवनीताई जाधव उपस्थित होत्या. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ड.आंबादास आवारे, योगीराज तुकाराम बाबा संस्थानचे ह.भ.प. केशव महाराज जाधव, लासलगाव पोलीस स्टेशनचे स.पो.नि. भास्करराव शिंदे, उपप्राचार्य प्रा.भूषण हिरे, प.पू. तुकाराम बाबा माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालयाचे प्राचार्य लहानु ठाकरे, विजय सदाफळ, खेडलेझुंगे चे उपसरपंच विश्वनाथ घोटेकर, आनंदराव घोटेकर, तंटामुक्ती उपाध्यक्ष अशोक घोटेकर, पर्यवेक्षक उज्वल शेलार, किशोर गोसावी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी अमृताताई पवार, संजीवनीताई जाधव, लासलगाव पोलीस स्टेशनचे स.पो.नि. भास्करराव शिंदे आणि प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. तर गावाच्या वतीने ह.भ.प. केशव महाराज जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. स्वयंसेवकांचे प्रतिनिधी म्हणून शुभम आवारे व प्रियंका रासकर यांनी मनोगत व्यक्त केले. रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रदीप सोनवणे यांनी प्रास्ताविकातून शिबिर कालावधीत विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध कामाचा अहवाल सादर केला. उत्कृष्ट स्वयंसेवक आणि उत्कृष्ट ग्रुप ला मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. शिबिरात मोफत आरोग्य तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी श्रीक्षेत्र संतवन परिसर, ग्राम स्वच्छता, गावातील स्मशानभूमी, अंगणवाडी परिसर, गावातील रस्ते, ग्रामपंचायत कार्यालय परिसर, प्राथमिक शाळा परिसर, मंदिर परिसर, सार्वजनिक सभागृह परिसर, बाजारपेठ आदी ठिकाणी स्वच्छता केली. याप्रसंगी स्वयंसेवकांना दररोज योगा व लेझीम चे धडे देण्यात आले. तसेच शंखनाद कार्यशाळा, पेपर मॉडेल, जंगली मॉडेल, मॉडेल रिले, पथनाट्यातून जनजागृती, गावातील कुटुंब सर्वेक्षण इत्यादी उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिल गायकर यांनी केले, तर आभार प्रा.देवेन्द्र भांडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी स्वयंसेवक विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता रा.से.यो. गीताने झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री.गोविंदराव होळकर व प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रदीप सोनवणे, डॉ.संजय शिंदे, प्रा.सुनिल गायकर, प्रा.देवेन्द्र भांडे, प्रा.निकिता चव्हाण, प्रा.श्रेया जगताप, प्रा.राधा खांडगौरे, प्रा.कावेरी गुंड यांच्यासह प्राध्यापक व स्वयंसेवक विद्यार्थी वर्गाने परीश्रम घेतले.

